संदर्भ – कार्यालयीन आदेश क्र.४०८, दि.०५/१२/२०१८.

.......

जिल्हा न्यायालय, ठाणे
दिनांक– ०५/१२/२०१८

## कार्यालयीन आदेश क्रमांक ४०८

(लघुलेखाक–निम्न श्रेणी पदावर नेमणूकपत्र)

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे 'लघुलेखाक–नि.श्रेणी' या पदावर नेमणूकी संदर्भात खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

०१/ दिनांक १९/०९/२०१८ रोजी प्रसिध्द झालेल्या 'लघुलेखाक–निम्न श्रेणी' संवर्गाच्या निवड यादीतील खालील नमूद उमेदवार यांची 'लघुलखोक–नि.श्रेणी' या पदावर सुधारीत वेतन संरचनेत वेतन बॅड रू.९३००–३४८००/– + ग्रेड वेतन रू.४३००/– या वेतनश्रेणीमध्ये (प्रारंभिक वेतन रूपये १०१००/–) अस्थायी स्वरूपाची तात्पुरती नेमणूक दिनांक १०/१२/२०१८ मध्यान्हपुर्व पासून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या न्यायालयात करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव, पत्ता व निवड यादीतील अनुक्रमांक | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री हरीश विठ्ठल चौधरी (निवड यादीतील उमेदवार क्र.५)<br>रा. प्लॉट नं.५, गट नं. १९९, विर सावरकर नगर, प्रिंपाळा, जळगांव, जि.जळगांव<br>(इंग्रजी व मराठी लघुलेखान परिक्षा) | सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उल्हासनगर यांचे आस्थापनेवर, श्री सी.ए. जाधव यांची जिल्हा न्यायालय, नाशिक यांच्या न्यायीक आस्थापनेवर नेमणूक झाल्यामुळे रिक्त असलेल्या पदावर पदस्थापित. |

०२/ सदर नेमणूक पूर्णत: अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारास केव्हांही कोणत्याही प्रकारे नोटीस न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

०३/ सदर उमेदवाराने आपल्या उपरोक्त नेमणूकीवर नमूद तारखेस न चुकता हजर रहावे. तसेच नेमणूकीच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत हजर न झाल्यास सदर उमेदवाराचे नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल.

०४/ सदर उमेदवारास समज देण्यात येत आहे की, जर त्याने/तिने सदर नेमणूक एक महिन्याची नोटीस न देता सोडल्यास त्याचे/तिचेकडून त्यांच्या एक महिन्याचे मूळ वेतन (वेतन + ग्रेड वेतन) इतकी रक्कम वसूल करण्यात येईल.

०५/ सदर उमेदवाराने नेमणूकीच्या ठिकाणी हजर होतांना

१) त्याचा स्वत:चा मूळ फोटो असलेले ओळखपत्र (पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स,आधार कार्ड इ.यापैकी एक) यासह हजर व्हावे.

२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार आरक्षित प्रवर्गासाठी ३०% गुण व सर्वसाधारण (खुला) प्रवर्गासाठी ३५% गुण लघुलेखान परीक्षेत मिळणे आवश्यक होते. परंतू वर नमूद उमेदवाराने इंग्रजी व मराठी लघुलेखान परीक्षेत वर नमूद गुण प्राप्त केलेले नसल्याने त्यांना नेमणूकीचे आदेश प्राप्त झाल्यापासून एका वर्षाच्या आत कार्यालयामार्फत घेण्यात येणारी लघुलेखनाची परीक्षा वरील प्रमाणे गुण मिळवून उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

त्याप्रमाणे नेमणूक तदर्थ तत्वावर करण्यात आलेली असून सदरची लघुलेखनाची परीक्षा 'मी एक वर्षाच्या आत उत्तीर्ण न झाल्यास माझी सेवा खंडीत करण्यात येईल' या आशयाचे बंधपत्र कार्यालयात हजर होतांना सादर करणे आवश्यक आहे.

०६/ सदर उमेदवारास महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार भाषा संचालनालय आयोजित एतदर्थ मंडळाची मराठी लघुलेखानाची ८० श.प्र.मि. व मराठी टंकलेखानाची ३० श.प्र.मि. या गतीची परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यास/तिस नियमानुसार उचित कारवाईस सामोरे जावे लागेल.

०७/ महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/ सेवा—४, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि.३१/१०/२००५ अन्वये असे सूचित करण्यात येते की, १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन 'परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना' लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम—१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

ठाणे
दिनांक —०५/१२/२०१८

(व्ही. जी. बिष्ट)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
ठाणे

... ... ...

जा.क्र.आस्था/ ७६४३/२०१८
जिल्हा न्यायालय, ठाणे
दिनांक – ०५/१२/२०१८

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना</u>

१. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उल्हासनगर

२. प्रबंधक, जिल्हा न्यायालय, ठाणे

३. अधीक्षक, प्रशासन विभाग, जिल्हा न्यायालय, ठाणे

४. सहा.अधीक्षक, रोखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, ठाणे

हुकूमावरून,

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, ठाणे

05 DEC 2018